follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 | वर्ष २६ | अंक ३२२ | सातारा | गुरूवार दि.२२ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ५/- रूपये

# २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक

## बदलापूर अत्याचार प्रकरणावरुन काँग्रेस आक्रमक



**मुंबई :** राज्याचे वातावरण सध्या बदलापूर अत्याचार प्रकरणावरुन तापले आहे. केवळ चार वर्षांच्या चिमुकलीवर शिपाई अक्षय शिंदे याने केलेल्या अत्याचारामुळे संपूर्ण राज्य हादरुन गेलं आहे. राज्यसह देशभरातून यावर रोष व्यक्त केला जात आहे. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था नाही, कायद्याचा धाक नाही आणि पोलीसांवर देखील गृहमंत्र्यांचा वचक नाही अशा टीका महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून केल्या जात आहे. विरोधकांनी या प्रकरणावरुन सत्ताधाऱ्यांना घेरले असून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा राजीनामा मागितला आहे. या प्रकरणावरुन काँग्रेसने मंत्रालयाबाहेर देखील आंदोलन छेडले. तसेच येत्या २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद ची हाक काँग्रेसकडून देण्यात आली आहे.

काँग्रेस नेत्यांनी बदलापूर प्रकरणावरुन राज्य सरकारला घेरले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राज्य सरकारवर हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नाना पटोले म्हणाले आहेत की, बदलापूरमध्ये झालेल्या प्रकारामुळे समाजमन हेलावून गेलं आहे. खऱ्या अर्थाने आज आपल्या महाराष्ट्रामध्ये लहान मुली देखील सुरक्षित नाही. ही घटना महाराष्ट्रालाच काळीमा फासणारी आहे. किंबहुना हे प्रकरण दाबण्यासाठी सरकारनेच प्रयत्न केले असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनात येत आहे. प्रकरणातील शिक्षण संस्था भाजप आणि संघाशी निगडित असल्याने भाजप आणि संघाची बदनामी होऊ नये म्हणून अशा पद्धतीची काळजी त्या ठिकाणी घेत आहे. परिणामी, त्याचा उद्रेक समाजामधून झाल्याचे काल बघायला मिळाले. सत्ता आणि सत्तेची गर्मी त्यातून त्याची गुरमी या ठिकाणी बघायला मिळालीय, असा घणाघात नाना पटोले यांनी केला आहे.

### २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक

**पुढे त्यांनी या प्रकरणावरुन महाराष्ट्र बंदाची हाक दिली आहे. नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्राची प्रतिमा मलीन करण्याचं काम रोज राज्यात होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्राला, शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांच्या महाराष्ट्राला अपमानित आणि काळ लावण्यात येत आहे. त्याचा आम्ही निषेध करतो. या गंभीर प्रश्नावर आम्ही महाविकास आघाडीमध्ये चर्चा केली. या सर्व प्रकरणाचा निषेध म्हणून आम्ही येत्या २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक देत आहोत. या आंदोलनात महाविकास आघाडीतील सर्व मित्र पक्ष, घटक पक्ष, अनेक संघटना, शाळा कॉलेज, दुकानदार आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतील. सध्या घडीला महाराष्ट्रात जे अकार्यक्षम सरकार आहे, त्याला आपली जागा दाखवण्याचा प्रयत्न नागरिक करतील, असे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले.**

### वडेट्टीवार यांनी घेतली आक्रमक भूमिका



**त्याबरोबर विधानसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील बदलापूर घटनेबाबत तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. वडेट्टीवार म्हणाले आहेत की, बदलापूर अत्याराच्या प्रकरणी विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नेमणूक करण्यात आलीय, या नियुक्तीवर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आक्षेप घेत सरकारवर टीका केली आहे. ती शिक्षण संस्था एका पक्षाशी संबंधित आहे. त्याच पक्षाच्या सबंधित वकिलाला विशेष वकील म्हणून नेमणूक केलीय, ज्याने लोकसभेची निवडणूक लढवली आहे. उद्या हे प्रकरण दाबले गेले, तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे.**

## जय शहा बनणार आयसीसीचे नवे अध्यक्ष



**बंगळुरू :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शहा हे आयसीसी या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रिकेटचे नियमन करणाऱ्या सर्वोच्च संस्थेचे अध्यक्षपद मिळवणार आहेत. मावळते अध्यक्ष ग्रेग बार्कले यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबर रोजी संपुष्टात येत आहे. त्यापूर्वीच त्यांनी सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी आपण स्पर्धेत नसल्याचे जाहीर केले आहे.

जय शहा यांना ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या देशांच्या क्रिकेट नियामक मंडळानेही पाठिंबा दिला आहे. त्यामुळे जय शहा अध्यक्षपदाच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाल्याचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

जय शहा हे केवळ ३५ व्या वर्षी आयसीसीच्या अध्यक्षपदाची सूत्र हाती घेणार असून सर्वात कमी वयात ही जबाबदारी स्वीकारण्याचा विक्रम शहा यांच्या नावे होणार आहे. यापूर्वी जगमोहन दालमिया, शरद पवार, एन श्रीनिवासन आणि शशांक मनोहर या भारतीयांनी आयसीसीचे अध्यक्ष पद भूषविले आहे.

आयसीसी चे अध्यक्ष पदाचा कार्यकाळ दोन वर्षांचा असतो. एक अध्यक्ष सलग तीन कार्यकाल पदावर राहू शकतो. बार्कले यांनी सन २०२० पासून दोन कार्यकाळ अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली आहे. तिसऱ्या कार्यकाळात अध्यक्ष पदासाठी उत्सुक नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. जय शहा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव असून आयसीसीमधील प्रभावशाली चेहरा म्हणून त्यांना ओळखले जाते. आयसीसी अध्यक्षपदासाठी १६ देशांच्या क्रिकेट नियामक मंडळाचे प्रतिनिधी मतदान करतात. अध्यक्षपदावर येण्यासाठी साधारण बहुमत मिळवणे आवश्यक असते. यापूर्वी अध्यक्ष पदासाठी तीन चतुर्थांश बहुमताची आवश्यकता होती. जय शहा यांचे आयसीसीमध्ये सहभागी असलेल्या सर्व देशांच्या प्रतिनिधींशी सलोख्याचे संबंध आहेत. अध्यक्षपदासाठी अर्ज करण्याची मुदत २७ ऑगस्ट परत आहे. अध्यक्ष पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज आल्यास निवडणुकीने अध्यक्ष निवडला जाणार आहे. मात्र, या अध्यक्षपदासाठी जय शहा यांचे नाव निश्चित मानले जात आहे.

## बदलापूर अत्याचारप्रकरणी आरोपी अक्षय शिंदेला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी



बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थीनीवर झालेल्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर हजमुंबई : बदलापूर येथील एका नामांकित शाळेत दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यातील एक चिमुकली तीन वर्षे आठ महिन्यांची आहे. तर दुसरी चिमुकली ही सहा वर्षांची आहे. हा धक्कादायक प्रकार उजेडात येताच जमाव मोठ्या प्रमाणात संतप्त झाला आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात आहे. असे असताना यातील आरोपी अक्षय शिंदे याला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थीनीवर झालेल्या अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर हजारो नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. सकाळपासून नागरिकांनी शाळेबाहेर आंदोलन सुरू केले. शेकडो नागरिकांनी उपनगरीय रेल्वेची वाहतूकही रोखून धरली होती. त्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक सेवा गेल्या दोन तासांपासून ठप्प झाली होती. संपूर्ण बदलापुरात संतापाचे वातावरण आहे. यातच आरोपी अक्षय शिंदे याला २६ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

## बदलापुरातील तीनशे आंदोलकांवर गुन्हे, २८ जणांना अटक

**मुंबई :** बदलापुरातील नामांकित शाळेतील दोन चिमुरडींवरील अत्याचाराच्या घटनेनं महाराष्ट्र हादरला आहे. या घटनेनंतर बदलापुरातील नागरिक कमालीचे संतापले होते. काल त्यांनी बदलापूर रेल्वे स्थानक आणि संबंधित शाळेबाहेर जोरदार आंदोलन केले. काही वेळानंतर मात्र या आंदोलनांना हिंसक वळण लागले. पोलिसांनी आंदोलकांना समजून सांगण्याचा प्रयत्न केल्यानंतरही आंदोलकांनी ऐकलं नाही. त्यामुळे आंदोलकांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज आणि अश्रूधुराचा मारा करण्यात आला. यानंतर चिडलेल्या आंदोलकांनी पोलिसांवरच दगडफेक केली. यामुळे पोलीस प्रशासनाने पुढील कारवाई करत ३०० ते ४०० लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच २८ जणांना अटकही केली आहे.

आता येथील परिस्थिती नियंत्रणात आहे. तरी देखील कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आज इंटरनेट बंदच ठेवण्यात आले आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज तपासून आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत २८ जणांना अटक करण्यात आली आहे. रेल्वे रोको, सरकारी कामात अडथळा, दगडफेक आणि दंगल घडवण्याचा प्रयत्न अशा विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले जात आहेत. अटक करण्यात आलेल्या आंदोलकांना आज न्यायालयात हजर केले जाणार आहे.

तर दुसरीकडे राज्य सरकारने या प्रकरणात कारवाईची सुरुवात करत तीन पोलीस अधिकाऱ्यांना या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केल्याने निलंबित करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणाच्या पुढील तापासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असल्याची माहिती देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. एसआयटी स्थापन केल्यामुळे या प्रकरणाचा तपास अधिक वेगाने होईल असे सांगण्यात आले.

## रशियाची राजधानी मॉस्कोवर युक्रेनचा ड्रोन हल्ला

**मॉस्को:** वर्षभराहून अधिक काळ सुरू असलेल्या रशिया आणि युक्रेन युद्धाने अधिक व्यापक स्वरूप धारण केले असून युक्रेने रशियाची राजधानी मॉस्को या शहरावर आत्तापर्यंत सर्वात मोठा ड्रोन हल्ला केला आहे. युक्रेंची १० ड्रोन्स आपल्या हवाई सुरक्षा यंत्रणेने नष्ट केली असून या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही, असा दावा रशियाच्या वतीने करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच युक्रेनला भेट देणार आहेत. यापूर्वी रशियाला भेट देऊन राष्ट्र प्रमुख व्लादिमीर पुतीन यांच्याशी मोदी यांची युद्धासंबंधात चर्चा झाली होती. मोदी सध्या पोलंडमध्ये असून दि २३ रोजी ते. युक्रेनचे पंतप्रधान व्लादिमीर झेलेन्स्की यांची भेट घेणार आहेत. मोदी यांच्या युक्रेन भेटीनंतर रशिया युक्रेन युद्धातून तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, मोदी यांच्या भेटीपूर्वीच युक्रेने रशियाच्या राजधानीवर मोठा ड्रोन हल्ला चढविला आहे.

## शरद पवारांना मिळणार केंद्राची न+ सुरक्षा



**मुंबई :** राज्यात सध्या अनेक घडामोडी घडत आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा देखील राज्यात चांगलाच तापलेला पाहायला मिळत आहे. काल बदलापूर येथील चिमुरडींवर अत्याचाराची घटना घडली आहे. तसेच अनेक अशा घटना आहेत ज्या राज्यभरात घडत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सुरक्षेत आता वाढ करण्यात येणार आहे. शरद पवारांना आता झेड प्लस सुरक्षा देण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून ही सुरक्षा दिली जाणार आहे. शरद पवार यांना राज्य सरकारने झेड प्लस सुरक्षा दिली आहे. मात्र आता त्यांना केंद्र सरकारकडून अतिरिक्त सुरक्षा देण्यात येणार आहे. त्यामुळे सीआरपीएफचे १० जवान आता शरद पवारांच्या सुरक्षेत असणार आहेत. नुकताच सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांनी शरद पवारांसोबत सुरक्षेचा आढावा घेतला. त्यानंतर पवारांना केंद्राची सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या राज्यात सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांची सुरक्षा व्यवस्था वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शरद पवारांच्या घरी दररोज अनेक बैठका होत असतात. शेकडो लोक त्यांना भेटण्यासाठी येत असतात.

## बदलापूरचे आंदोलन राजकारणाने प्रेरित

### लाडकी बहीण योजनेचा पोटशूळ दिसला; मुख्यमंत्री शिंदेंचा घणाघात



**मुंबई :** बदलापूर अत्याचार प्रकरणावरुन राज्याचे वातावरण तापले आहे. चिमुकल्या मुलींवर शाळेतील शिपाईने केलेल्या अत्याचारामुळे नागरिक रोष व्यक्त करत आहे. या संदर्भात बदलापूरमध्ये सध्या तणावपूर्ण शांतात असून बदलापूरमधील इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली आहे. त्याचबरोबर सर्व शाळांना देखील सुट्ट्या जाहीर करण्यात आली आहे. काल बदलापूरमध्ये अतिशय तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी आंदोलकांनी केली. बदलापूरच्या रेल्वे रुळावर तब्बल १२ तास आंदोलक होते. अनेकदा समजवण्याचा प्रयत्न केल्यानंतर आंदोलक माघार घेत नसल्यामुळे पोलिसांनी लाठीचार्ज देखील केला. या प्रकरणावर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून बदलापूरच्या घटनेवरुन विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना घेरले आहे. बदलापूर प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, बदलापूरमधील घटना अतिशय दुर्दैवी आहे. आरोपींनी कठोर शिक्षा देण्यासाठी कारवाई करावी असे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. ही केस फास्ट ट्रॅकवर घेण्यात येईल, त्यासाठी एसआयटी नेमण्यात आली आहे. ज्या पोलिसांनी दिरंगाई केली त्यांना निलंबित करण्यात आलं आहे. या परिवाराच्या मागे शासन असून सर्व सहकार्य करण्यात येईल. भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून पाऊलं उचलण्यात आली आहेत, असे मत एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

लाडकी बहीण योजनेचा पोटशूळ विरोधकांना उठला

बदलापूर प्रकरणावरुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनामाच्या मागणी केली आहे. यावरुन विरोधकांना उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, यामध्ये लहान बच्चू आहेत. त्यामुळे यावरुन राजकारण करु नये. कालच्या आंदोलनामुळे दुर्दैवाने लाखो रेल्वे प्रवाशांना त्रास झाला. हे व्हायला नको होतं. परंतु कालचं आंदोलन हे राजकीय प्रेरित होतं. इतक्या जलदगतीने गाड्या भरून बाहेरून लोक आले. आंदोलकांना मंत्र्यांनी समजावलं, सगळ्या मागण्या मान्य केल्या. तरीही ते माघार घेत नव्हते. त्यांना सरकारला बदनाम करायचं होतं. राजकारण करायला अनेक मुद्दे आहेत. लहान मुलीचे राजकारण करणाऱ्याला लाज वाटली पाहिजे. राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेचा पोटशूळ विरोधकांना उठला आहे. विरोधकांना सांगणं आहे की यावरून राजकारण करू नका. लाडकी बहीण योजना त्यांच्या जिव्हारी लागली असल्याचं हे कालच्या आंदोलनातून स्पष्ट झालंय, अशी घणाघाती टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

## 'गृह खात्यावर फडणवीसांचा वचक नाही'; भास्कर जाधव यांची बोचरी टीका



**मुंबई :** बदलापूरमध्ये चिमुकल्यांवर अमानुषपणे अत्याचार करण्यात आले. अवघ्या ४ वर्षांच्या दोन मुलींवर शिपाई अक्षय शिंदे याने अत्याचार केले. यामध्ये मुलींच्या आतड्यांपर्यंत जखमा झाल्या आहेत. यामुळे संपूर्ण बदलापूर शहरामध्ये राज्यभरामध्ये तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. तसेच या प्रकरणाची पोलीस तक्रार आल्यानंतर देखील १२ तासांनंतर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे नागरिकांनी पोलीस आणि कायदा व व्यवस्था यावरुन सरकारला धारेवर धरले आहे. विरोधकांनी देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आमदार भास्कर जाधव यांनी देवेंद्र फडणवीस यांचा गृह खात्यावर वचक नसल्याचे म्हणत टोला लगावला आहे.

गृहमंत्री असा पाहिजे की नुसती नजर फिरली तरी

शिवसेना ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. बदलापूरमध्ये झालेली घटना अतिशय निंदनीय असून यासाठी सरकारच जबाबदार असल्याचे मत आमदार भास्कर जाधव यांनी व्यक्त केले. माध्यमांशी संवाद साधताना आमदार जाधव म्हणाले, या घटनेला पूर्णपणे सरकार जबाबदार आहे. पुण्याच्या अग्रवाल प्रकरणात रक्ताचे नमुने बदलण्यापासून घटना घडल्या आहेत. तसेचट नागपूरमध्ये पोलीलच स्टेशनमध्ये जुगार खेळत आहेत. देवेंद्र फडणवीसांच्या नागपूरमधील परिस्थिती बघितली तर, खून, बलात्कार, दोन नंबरचे धंदे सगळ्यात जास्त नागपूरमध्ये आहेत. गृहमंत्री असा पाहिजे त्याची नुसती नजर फिरली, तरी पोलिसांच्या माना खाली झुकल्या पाहिजे. पोलिसांवर कंट्रोल नाही ठेवला तर, हे क्रूर होतील, हिंस्र होतील, रानटी होतील, पोलिसांना गृहखात्याचा दरारा पाहिजे, गृहमंत्री यांचा गृह खात्यावर वचक नाही, अशी घणाघाती टीका भास्कर जाधव यांनी केली आहे.

फडणीस यांचा अजिबात गृह खात्यावर वचक नाही

पुढे भास्कर जाधव यांनी उद्धव ठाकरे यांच्या सरकारवेळेची परिस्थिती सांगून महायुतीला डिवचले आहे. भास्कर जाधव म्हणाले, उद्धव ठाकरेंच्या



**जोरदार पावसाने उकिरड्याचा पाझर तलाव भरला तुडुंब.. दरवर्षी सातारा जिल्ह्यातील दुष्काळी अशा माण तालुक्यातील उकिरडे गावानाजीकचा पाझर तलाव जो ब्रिटिश काळात बांधण्यात आला होता तो सदैव कोरडाच पाहायला मिळत असे मात्र यावर्षी झालेल्या दमदार पावसामुळे हा उकिरडे गावांनाजीकचा पाझर तलाव असा तुडुंब भरला.**

# अजितदादांची वारंवार क्षमापना !

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रशासनावर पकड आहे. ते स्पष्टवक्ते आहेत. त्यांच्या कामाचा आवाका मोठा आहे; असे असतानाबोलण्याच्या ओघातते काहीही बोलून जातात आणि वादाच्या भोवऱ्यात सापडले, की माफी मागतात. अशा घटना वारंवार घडत आहेत. राज्यातील सर्वोच्च पद वारंवार हुलकावणी देत असल्याने वेगवेगळे निर्णय घेऊनही हे पद दूर जात आहे, त्यामुळे अजितदादांना नैराश्य आले आहे, की काय असा प्रश्न पडतो. सत्तेच्या चक्रव्यूहात त्यांचा अभिमन्यू झाला आहे.**

## स्थित्यंतर

राही भिडे
९८६७५२१०४९



जैन समाजातील पर्युषण पर्वात शेवटच्या दिवशी 'मिच्छामि दुक्कडम' म्हणत एकमेकांची क्षमा मागितली जाते. वर्षभर कळत न कळत हातून झालेल्या चुकांबद्दल किंवा अनवधानाने कुणी दुखावले असल्यास त्याबद्दल माफी मागून मोकळे व्हायचे, असा त्याचा अर्थ आहे. अजितदादा तर वारंवार या क्षमापनेला सामोरे जात आहेत. राज्यातील धरणे भरण्याच्या वादग्रस्त विधानावरून त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कराड येथील स्मृतिस्थळी जाऊन प्रायश्चित घेतले होते. त्यानंतर पहाटेचा शपथविधी असाच पक्षात वाद निर्माण करून गेला. पक्षात काही मिळत नाही, म्हणून त्यांनी दुसरे बंड केले. राज्यात एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षाही संसदीय राजकारणात वरिष्ठ असताना अजित पवार यांना दुय्यम भूमिका घ्यावी लागते. त्यांच्या विभागाच्या फाईल्स अडवून ठेवल्या जातात. मुख्यमंत्र्यांनी त्याचे स्पष्टीकरण दिले, तरी त्याला अर्थ नाही. टोयोटो कंपनीबाबतच्या सामंजस्य करारावर सह्या करण्याच्या कार्यक्रमात त्यांना टाळण्यात आले. राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये फूट पाडूनही लोकसभेला फार यश मिळवता आले नाही. उलट, शरद पवार यांनी आठ जागा जिंकून दाखवल्या. एवढी मोठी जोखीम पत्करूनही संघ परिवार वारंवार अजित पवार यांच्यामले भाजपला लोकसभेत

अजितदादांची वारंवार क्षमापना !

कमी यश मिळाल्याचा ठपका ठेवत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मुखपत्रे एकामागून एका लेखात अजितदादांनाच दोष देत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपला अजितदादांची कशी गरज आहे, हे सांगितले असले आणि संघ परिवारासमवेत बैठक घेऊन मनभेद मिटवण्याचा प्रयत्न केला असला, तरी परिवार अजूनही अजितदादांना स्वीकारायला तयार नाही. नाशिकच्या सभेत त्यांनी कांद्याच्या निर्यातबंदीबाबत केंद्राला विनंती करूनही त्यांनी निर्यातबंदी उठवली नाही, त्यामुळे शेतकऱ्यांनी असा धडा शिकवला, की कंबरडे मोडले असे सांगत चूक झाली, माफी मागतो, अशा शब्दांत त्यांनी क्षमापना केली. स्वत:बरोबरच इतरांच्या चुकांबाबतही अजितदादा माफी मागायला लागले आहेत याला काय म्हणावे. देशात गाजलेल्या बारामती लोकसभा निवडणुकीबाबतही आता अजितदादांना आपली चूक झाल्याचे वाटायला लागले आहे. आ. रोहित पवार यांनी अजितदादांना या चुकीवरून टार्गेट केले आहे. भाजपच्या दबावाला बळी पडून अजितदादांनी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली आणि आत्मघात ओढवून घेतला, असे ते म्हणाले. आताही बारामती आणि जामखेड-कर्जत मतदारसंघात भाजपचा पवार-विरुद्ध पवार असा संघर्ष घडवून आणण्यासाठी भाजप अजितदादांवर दबाव आणित असल्याचा आरोप पुतण्यानेच केला आहे.

बारामत लोकसभा मतदार संघातील उमेदवारीबाबत अजित पवार म्हणाले, की मागच्या काळात माझ्याकडून चूक झाली. मी माझ्या बहिणीविरोधात सुनेत्राला (पत्नी) उभे करायला नको होते; पण त्यावेळेस केले गेले, पक्षाच्या संसदीय मंडळाने निर्णय घेतला होता. जे झाले ते झाले. एकदा बाण सुटल्यावर आपण परत काही करू शकत नाही; पण आज माझे मन मला सांगते तसे व्हायला नको होते, असे सांगून अजित पवार यांनी आपल्याकडून चूक झाली हे मान्य केले खरे; पण आताच

कामान्य केले? निवडणुकांचे निकाल आले, तेव्हाही त्यांना त्यावर लगेच बोलता आले असते किंवा विधानसभा निवडणुकांच्या निकालांनंतरही बोलता आले असते. आताच या क्षमापनेचे टायमिंग का, असा प्रश्न उपस्थित होतो. जनसन्मान यात्रा सुरू असताना आणि ऐन विधानसभा निवडणुकांच्या धामधुमीत अजित पवार यांनी आपण चुकलो, असे म्हटल्याने सगळ्यांच्याच भुवया उंचावल्या आहेत. खरेतर त्यांना भाजपच्या दबावाला बळी पडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली, असे म्हणायचे असावे. सुनेत्रा पवार यांना सुप्रिया सुळे यांच्या विरोधात मैदानात उतरवल्याने पवार कुटुंब दुभंगले. अजित पवार कुटुंबात एकाकी पडले. भाऊ, बहिणी, चुलते, काकू, असे सर्व दुरावले. आत्यांनी केलेला समेटाचा प्रयत्न फसला. आता लाडकी बहीण योजनेचा प्रचार करताना बहिणीला लोकसभा निवडणुकीत पाडण्यास निघालेल्या अजितदादांचे भगिनीप्रेम कंसासारखे असल्याची टीकाही झाली. त्यामुळे त्यांना क्षमापनेची उपरती झाली. अर्थात, अजित पवार यांच्या परतीचे दोर कापले गेले आहेत, असे शरद पवार यांनी आधीच स्पष्ट केले आहे; पण तरीही अजित पवार परतीची चाचपणी करत आहेत की त्यांना आणखी काही साध्य करायचे आहे? याचे उत्तर ३.६० टक्क्यांमध्ये दडले आहे. हा आकडा आहे लोकसभा निवडणुकांमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीचा.

अर्थात त्यांनी ४८ पैकी फक्त ४ जागा लढवल्या आणि जिंकली एक. अजित पवार जिंकलेल्या एका जागेपेक्षा हारलेल्या एका जागेसाठी राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरले. त्याच वेळी शरद पवार यांच्या नेतृत्वात लढलेल्या पक्षाला १०.२७ टक्के मते मिळाली. त्यांनी १० जागा लढवल्या आणि आठ खासदार निवडून आणले. अजित पवार यांनी सर्व मरगळ झटकून टाकली. पत्नी सुनेत्रा यांना राज्यसभेवर पाठवले आणि विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सुरू केली. निवडणुकीची रणनीती आखण्यासाठी त्यांनी

वेगवेगळ्या पॉलिटिकल आणि पीआर एजन्सींची मदत घेतली आहे. त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा दावा केला जात असला, तरी अजितदादांनी क्षमापना का केली, असा प्रश्न उरतोच.

अजितदादांच्या बाबतीत लोकसभेच्या निवडणुकीने कुटुंब गेले, विजय हाती आला नाही आणि नाचक्की झाली, या कबुलीच्या माध्यमातून भाजपच्या दबावाखाली आपण चुकीचे निर्णय घेतले हे त्यांना ठसवायचे आहे. भाजपमुळे अल्पसंख्याक आणि दलित मतदार दुरावले, अशी भावना अजित पवार यांच्या पक्षात आहे. काही नेत्यांनी अप्रत्यक्षपणे बोलूनही दाखवले आहे. दुसरीकडे, अजित पवार आणि भाजपमध्ये सर्वकाही आलबेल आहे, असे म्हणता येत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मात्र अजित पवार आणित्यांच्या पक्षाला लक्ष्य केले आहे. काही कनिष्ठ नेत्यांनी अजितदादा सोबत नको, असे थेट जाहीरपणे सांगितले. विधानसभेच्या जागा वाटपाची चर्चा आता सुरू झाली आहे. जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न महायुतीतल्या तिन्ही पक्षांचा आहे. भाजप कुठल्याही स्थितीत १५० जागांच्या खाली येणार नाही, असे वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांमध्ये येऊ लागले आहे.

त्या खालोखाल जागा पदरात पाडून घेण्यासाठी एकनाथ शिंदे यांनीसुद्धा जोर लावला असल्याने महायुतीत अजित पवार यांचा पक्ष तिसऱ्या स्थानी राहील हे अजित पवार यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे त्यांची कोंडी झाली आहे. त्यांच्या बालेकिल्ल्यांमध्येही त्यांना यंदाची निवडणूक सोपी नाही. आता पदरात जागा कमी पडणे म्हणजे कमी जागा निवडून येणे आणि कमी आमदार निवडून येणे म्हणजे छोट्या समूहाचे नेतृत्व करणे. म्हणजे आपसूकच 'बार्गेनिंग पॉवर' कमी होणे. त्याचा थेट परिणाम महत्त्वाकांक्षेवर होतो, अजित पवार सध्या आत्मपरीक्षणाच्या कालखंडातून जात असून, या पुढे त्यांचे राजकारण कसे वळण घेते हे पाहणे औत्सुक्याचे असेल.

# मुंबई उपनगर जिल्ह्याचा महिलांसाठी 'रक्षा पॅटर्न'

## पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले निर्देश

**मुंबई :** कॅबिनेट मंत्री आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मुंबई उपनगराच्या जिल्हाधिकाऱ्यांना महिला आणि बालकांच्या सुरक्षेसंदर्भात एका पत्राद्वारे महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. महिला व बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुंबई उपनगरातील विविध शाळा महाविद्यालयात महिला व विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात असे या पत्रात प्रामुख्याने सांगण्यात आले आहे.

त्याचबरोबर आज बांद्रा येथील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना, राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व मुंबई उपनगरमधील प्रत्येक महाविद्यालयात १ सप्टेंबरपासून युवतींना स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

आपल्या पत्रात मंत्री लोढा म्हणाले, महिला आणि बालकांविरुद्ध वाढणारे अत्याचार ही सरकारसाठी, प्रशासनासाठी आणि आपल्या समाजासाठी चिंतेची बाब आहे. बदलापूरमध्ये झालेल्या घटनेचे पडसाद म्हणून, नागरिकांनी काही उपाययोजना सुचवल्या आहेत. महिलांच्या सुरक्षेबाबत केलेल्या दुर्लक्षामुळे अशा घटना घडताना दिसत आहेत. ही बाब लक्षात घेऊन मुंबई उपनगरातील केजी ते पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंत सर्व शैक्षणिक संस्थांना सक्त निर्देश द्यावेत. शाळा व महाविद्यालयाने आणि विविध संस्थांनी आपल्याकडे नियुक्त केलेल्या स्टाफची देखील खात्रीपूर्वक तपासणी करावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी खबरदारी घ्यावी!

### पत्रात मंत्री लोढा यांनी केलेल्या सूचना

१. शाळा परिसरात स्वच्छतागृह वगळता संपूर्ण परिसर उघडत च्या कक्षेत आणावे. त्यासाठी कॅमेरे बसवावे व ते कायम सुरक्षित, सुस्थितीत आहेत याची पडताळणी बिट मार्शल / फिरते पोलीस पथक यांनी वेळोवेळी करावी.

२. मुलींच्या स्वच्छतागृहांबाहेर एका महिला कर्मचाऱ्यास कायम देखरेखीसाठी नियुक्त करण्यात यावे.

३. ल्पवयीन मुलींसाठी व दहावीत शिकणाऱ्या मुलींसाठी असणाऱ्या स्वच्छतागृहांच्या स्वच्छता कर्मचारी महिला असतील याची सक्तीने अंमलबजावणी करावी.

४. विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी कार्यरत असणाऱ्या बसेस, टॅक्सी, व्हॅन यामध्ये एक महिला कर्मचारी असणे सक्तीचे करावे.

५. शाळेत कार्यरत स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घ्यावे.

६. मुलींना स्व-संरक्षणाचे धडे द्यावेत, यासाठी शाळा प्रशासनाने स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी.

७. शाळेत उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत बालकांनी / मुलांनी त्या शाळेची तक्रार १०९८ या हेल्पलाईन नंबरवर नोंदवावी. या बाबतीत शाळेत भित्तीपत्रके लावण्यात यावीत.

८. शाळेत महिला पालकांची एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी. या बैठकीची दर महिन्याला बैठक घेऊन मुलींच्या समस्यांविषयी चर्चा व्हावी.

९. महिला आणि मुलींना आपत्कालीन परिस्थितीत १८१ या हेल्पलाईनचा वापर करण्याबाबत सर्व शाळा महाविद्यालयांना प्रत्येक वर्गात, परिसरात भित्तीपत्रके लावण्याच्या सूचना देण्यात याव्या.

# झगमगत्या रुपेरी पडद्यामागील काळे वास्तव

**मुंबई:** प्रादेशिक चित्रपटांपासून बॉलीवडपर्यंत झगमगत्या चित्रपटसृष्टीत प्रस्थापित होण्याचे अनेक तरुण-तरुणींचे स्वप्न असते. पाण्यासारखा पैसा, ऐशोआरामाचे जीवन, जीव ओवाळून टाकणारे चाहते, वारेमाप प्रसिद्धी या चित्रपटसृष्टीतील डोळे दिपवून टाकणाऱ्या गोष्टी असल्या तरीही प्रत्यक्षात हे सारे सहजपणे, साधे सरळपणाने प्राप्त करता येत नाही. मल्याळम चित्रपटसृष्टीतील पडद्यामागचे काळे वास्तव न्या. हेमा समितीच्या अहवालाने उजेडात आणले आहे. मल्याळम चित्रपटसृष्टी हा अपवाद नाही तर प्रादेशिक चित्रपटांपासून बॉलीवूडपर्यंत साऱ्याचे ते प्रतिबिंब आहे.

मल्याळम चित्रपटात काम देण्याच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी केली जात असल्याचा आरोप अनेक अभिनेत्रींनी केल्यानंतर आणि त्या संदर्भात एक खटला दाखल झाल्यानंतर सन २०१९ मध्ये सरकारने या संदर्भातील वास्तव जाणून घेण्यासाठी न्या हेमा यांच्या नेतृत्वाखाली समिती नियुक्त केले. या समितीने आपला अहवाल सादर केला असून या अहवालात रुपेरी पडद्यामागच्या काळ्या वास्तवाचे पोलखोल करण्यात आले आहे.

मल्याळम चित्रपटसृष्टीमध्ये चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकार यांचा समावेश असलेले १५ जणांचे एक टोळके कार्यरत आहे. चित्रपटात काम देण्याच्या बदल्यात निर्माते आणि दिग्दर्शक अभिनेत्रीला शरीरसुखाची मागणी करतात. ही तडजोड मान्य करणाऱ्या अभिनेत्रींना कोड नेम दिले जाते. जी अभिनेत्री कोड नेमधारक आहे तिला चित्रपटांमध्ये प्राधान्याने काम दिले जाते. ती निर्माते आणि दिग्दर्शकांच्या पसंतीची अभिनेत्री असल्याचे शिक्कामोर्तब होते. त्याचप्रमाणे ती 'उपलब्ध' असल्याचेही संकेत मिळतात.

ज्या अभिनेत्री ही तडजोड करण्यास नकार देतात, त्यांना वाळीत टाकण्यात येते. त्यांना कामे मिळू दिली जात नाहीत. त्यांची पूर्ण कारकीर्दच उध्वस्त केली जाते. मल्याळम चित्रपटसृष्टीची सारी सूत्रे या पुरुषप्रधान टोळक्याच्या हातात आहेत. आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी या टोळक्याच्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला त्यांची कारकीर्द संपुष्टात आणण्यातझाल्यानंतरया सर्व बाबी निवृत्त न्यायाधीश हेमा यांच्या अध्यक्षतेखालील तीन जणांच्या समितीने आपल्या अहवालात उघड केल्या आहेत.

चित्रपटसृष्टीतील महिलांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी सरकारने पुढाकार घेण्याची आवश्यकता समितीने व्यक्त केली आहे. चित्रपटसृष्टीतील महिलांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी स्वतंत्र न्यायाधीकरण स्थापन करण्यात यावे, अशी सूचनाही न्या हेमा समितीने केली आहे.

एका मल्याळम अभिनेत्रीला ब्लॅकमेल करण्याच्या उद्देशाने तिचे अपहरण करण्यात आले. कारमध्येच तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले. या प्रकरणानंतर राज्यभर संतापाची लाट उफाळून आली. नागरिकांनी रस्त्यावर उतरून निदर्शने आणि आंदोलने केली. त्यामुळे दबावाखाली आलेल्या राज्य सरकारने चित्रपटसृष्टीतील महिलांच्या सुरक्षिततेबाबत वास्तव जाणून घेऊन आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी न्या हेमा समितीची नियुक्ती केली होती. मात्र, समितीच्या अहवालात व्यक्त झालेले वास्तव आणि समितीने केलेल्या शिफारशी अत्यंत स्फोटक असल्यामुळे त्याची अंमलबजावणी तर दूरच पण राज्य सरकारने तो प्रसिद्ध ही होऊ दिला नाही. अखेर माहितीच्या अधिकारात दाखल केलेल्या एका अर्जाची दखल घेऊन १९ ऑगस्ट रोजी राज्य सरकारला हा अहवाल प्रसिद्ध करावा लागला. अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर समाज माध्यमांपासून गाव गप्पांपर्यंत तो सर्वत्र चर्चेचा विषय बनला आहे.

# राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना जारी

## सीसीटीव्ही कॅमेरे, तक्रार पेटी, चारित्र्य पडताळणी



**पुणे :** बदलापूर मधील अनुचित प्रकारामुळे देश हादरला आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून ठोस पावले उचलली जात आहेत. शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने सीसीटीव्ही कॅमेरा, तक्रार पेटी, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी अहवाल इत्यादी उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे.

बदलापूर येथील घडलेल्या अनुचित प्रकारामुळे राज्य सरकारकडून ठोस पावले उचलली जात आहेत. आज २१ ऑगस्ट २०२४ रोजी शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच काही नवीन उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची सुरक्षा देखील अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यासाठीच्या उपाययोजनांसंदर्भात शासनस्तरावरून वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले असून या उपायोजनांशी तडजोड केली जाणार नाही, असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे

शाळा व परिसरात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरा हा उत्तम पर्याय असून खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरिता येत्या एक महिन्यात मोक्याच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील, तर शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत अशा शाळांनी प्राधान्याने कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. शाळा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज ठराविक अंतराने तपासणे आवश्यक असून अशा फुटेजमध्ये आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर योग्य कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापकांची आणि सर्वसाधारणपणे शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच बाह्य स्त्रोतांद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने केल्या जाणाऱ्या नेमणुकांबाबत शाळा व्यवस्थापनामार्फत काटेकोर तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे आवश्यक राहणार आहे. त्याचप्रमाणे नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणांकडे देणे आवश्यक राहील. शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करताना सहा वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असेही सूचविण्यात आले आहे.

## आदिवासी महिलेवर ८ जणांचा सामूहीक बलात्कार; ६ नराधमांना अटक, दोघे फरार

**बिलासपूर :** कोलकाता येथील डॉक्टर तरुणीवर बलात्कार प्रकरण आणि बदलापूरमध्ये दोन लहान मुलींवर झालेला अत्याचार या घटनेने संपूर्ण देशात संताप आहे. आता छत्तीसगडच्या रायगड जिल्ह्यात एका आदिवासी महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणात आतापर्यंत ६ जणांना अटक केली असून दोन आरोपी फरार आहेत.

बिलासपूर रेंजचे आयजी संजीव शुक्ला म्हणाले की, ही घटना सोमवारी संध्याकाळी घडवली आहे. ही आदिवासी महिला गावातील जत्रेत फिरण्यासाठी गेली होती. तिथे आलेल्या लोकांमध्ये पीडित महिला आरोपीला ओळखत होती आणि दोघांनी स्थानिक बाजाराजवळ भेटण्याचे ठरवले होते. ज्यावेळी मुख्य आरोपी तिला भेटला त्यावेळी त्याच्यासोबत अन्य लोकही होते. त्यानंतर आदिवासी महिलेला बळजबरीने तिथल्या तलावाजवळ नेले. तिथे नेऊन सर्वांनी तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. महिलेच्या माहितीनुसार, तिच्यावर तब्बल आठ लोकांनी बलात्कार केला. घटनेनंतर आरोपींनी महिलेला धमकी दिली आणि तिथून पळाले. अधिकाऱ्याने सांगितले की, पीडितेच्या तक्रारीनुसार आतापर्यंत सहा लोकांना अटक केली आहे.

## MPSC विद्यार्थ्यांची नाराजी दूर होणार? परीक्षांबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांचं मोठं विधान

**पुणे :** पुणे शहर हे विद्येचे माहेरघर आहे. लाखो विद्यार्थी या शहरात उच्च शिक्षण घेण्यासाठी येत असतात. दरम्यान देशभरातून हजारो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न घेऊन पुण्यनगरीत येतात. मात्र या विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन देखील करावे लागते. काल रात्रीपासून पुण्यातील एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मागणीसाठी ठिय्या आंदोलन करत आहे. दोन पेपर एकाच दिवशी आल्याने हे विद्यार्थी ठिय्या आंदोलन करत आहेत.

आयबीपीसी आणि एमपीएससीचे पेपर एकाच दिवशी आल्याने एक परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करत विद्यार्थी आंदोलन करत आहेत. दरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांची भेट घेतली. पुण्यातील नवीन पेठेत असणाऱ्या अहिल्या वाचनालयासमोर हे विद्यार्थी आंदोलन करत आहेत. यानंतर सुप्रिया सुळे यांनी आंदोलकांशी चर्चा केली आहे.

दरम्यान या ठिकाणी आंदोलकांची चर्चा केल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी यावर भाष्य केले. त्या म्हणाल्या, परीक्षा घेण्याला या विद्यार्थ्यांचा विरोध नाही. पण सर्व परीक्षा वेगवगेळी घ्यावी अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. या संदर्भातील विद्यार्थ्यांच्या ज्या काही मागणी असतील त्याबाबत मी मुख्यमंत्र्यांशी बोलेन. दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील याबाबत ट्विट करत माहिती दिली आहे.

देवेंद्र फडणवीस 'एक्स' वर म्हणाले, आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही २५ ऑगस्ट रोजी एकाच दिवशी आल्या आहेत. तसेच कृषी विभागाच्या २५८ जागांचा समावेश राज्य सेवा पूर्व परीक्षेत झालेला नाही. या दोन्ही कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे, त्यामुळे याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती मी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे.

# फडणवीस नेमक्यावेळी बॅकसीट घेतात; अंधारेंचे शिंदे फडणवीसांना घाम फोडणारे प्रश्न

**मुंबई :** बदलापूर येथील नामांकित शाळेत दोन चिमुरड्या विद्यार्थिनींवर अत्याचाराच्या घटनेनंतर राज्यातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर महायुती सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली जात असतानाच ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारेंनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांचे रिपोर्टकार्डच बाहेर काढले आहे. राज्याला कधी नव्हे असा कुचकामी आणि नापास गृहमंत्री मिळाला आहे अशी जिव्हारी लागणारी टीकाही अंधारेंनी केली आहे.त्या बदलापूर येथे माध्यमांशी बोलत होत्या.

यावेळी अंधारेंनी काल (दि. २०) बदालापूरमधील कायदा-सुव्यवस्था बिघडवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जबाबदार असल्याचा गंभीर आरोपही केला. रामगिरी महाराजांना भेटायला शिंदेंकडे वेळ आहे पण पीडित मुलीच्या घरी जायला त्यांना वेळ नाही असा सवाल करत वार्तांकन करणाऱ्या महिला पत्रकारबद्दल बोलणाऱ्या वामन म्हात्रेला अटक झाली पाहिजे अशी मागणीही अंधारे यांनी केली.

अंधारे म्हणाल्या की, बदलापूरच्या घटनेनंतर शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि गृहमंत्री म्हणून फडणवीस यांनी सर्वात पहिले समोर येऊन व्यक्त होणे महत्त्वाचे होते. मात्र, जबाबदार व्यक्ती सोडून टिल्ले-पिल्ले लोक बोलतात असे म्हणत काल आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन नागरिकांशी चर्चा करणारे गिरीश महाजन कोण? ते या खात्याचे मंत्री आहेत का? असा सवाल अंधारेंनी उपस्थित केला. या सर्व घडामोडींवर महाजनांचा बोलायचा काय संबंध असेही त्या म्हणाल्या.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पत्रकारांच्या मागण्या संदर्भात येत्या ८ दिवसात निर्णय घेऊ; चंद्रकांत पाटलांचं आश्वासन

**पुणे :** पुढील ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन पत्रकारांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलं आहे. ते पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाला राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दिनांक २८ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय येथे पत्रकार संवाद यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेचा आज समारोप आयोजित करण्यात आला होता. यावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं की, पुढील ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन स्वतंत्रपणे बैठक करून पत्रकारांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दिनांक २८ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत



पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या दीक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेचा समारोप आयोजित करण्यात आला होता. राहुल गिरी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. विश्वास आरोटे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्याचे पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, विधान परिषदेच्या नवनियुक्त आमदार पंकजा मुंडे, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, राज्य समन्वयक संतोष मानूरकर, कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, डिजिटल मिडिया प्रमुख सिद्धार्थ भोकरे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, ज्येष्ठ संपादक किसन भाऊ हासे, कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे, कोकण विभागीय कार्याध्यक्ष शैलेश पालकर, विदर्भ विभागीय अध्यक्ष नीलेश सोमाणी, अमरावती अध्यक्ष नयन मुंडे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष सुभाष डोके, पुणे विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रसिद्धी समन्वयक भगवान राऊत, राज्य सदस्य संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमावेळी चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं की, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील सर्व पत्रकारांच्या समस्या पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून तसेच प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या प्रस्ताविकातून मी समजावून घेतल्या आहेत. पुढील ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन आपल्या सोबत स्वतंत्रपणे बैठक करून त्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल. अलीकडच्या काळात माध्यम क्षेत्र हे असंघटित क्षेत्र झाले आहे. मात्र या क्षेत्रातील लोकांसाठी विद्या, वेतन, आरोग्य विमा, पेन्शन, आजारासाठी मदत व त्यांच्या जीवनात स्थैर्य कसे आणता येईल यासाठी सरकार प्रयत्न करेल. जिल्हा दैनिकांसाठी स्वतंत्रपणे जाहिरात धोरण राबविण्यात येईल तसेच पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची सूचनाही करण्यात येईल. राज्यसभा आणि विधान परिषदेवर जेव्हा पत्रकारांचा प्रतिनिधी घेण्याची तरतूद होईल. तेव्हा त्या विषयावर बोलणे उचित राहील. मात्र वसंत मुंडे यांना पत्रकारांचे नेते आणि पत्रकार म्हणूनही चांगले भवितव्य आहे. राज्याचे पर्यटन विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही मला पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमासाठी जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांच्या आज्ञेनुसार मी या कार्यक्रमाला आलो असून मी तुमचा निरोप उपमुख्यमंत्र्यांना सांगेल. पत्रकारांनाही या संवाद यात्रेतून नक्कीच न्याय मिळेल. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री मुंबईला आल्यानंतर या संदर्भात बैठक घेऊ. पंकजा मुंडे म्हणाल्या की, दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढल्याबद्दल मी वसंत मुंडे यांचे अभिनंदन करते. त्याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या यात्रा फक्त मुंडेंनाच चांगल्या जमतात. गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष यात्रा काढली होती. त्यानंतर राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. त्यानंतर मी देखील पुन्हा एक संघर्ष यात्रा काढली होती. त्यावेळीही राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. आता वसंत मुंडे यांनी पत्रकार संवाद यात्रा काढली आहे. दोन्ही मुंडेंनी काढलेली यात्रा राज्यात सत्ता परिवर्तन घडवून आणणाऱ्या ठरल्या मात्र वसंत मुंडेंनी काढलेली यात्रा आमचं शासन कायम ठेवणारी ठरेल.

प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून पत्रकारांच्या सर्व मागण्या मांडल्या. राज्यशासन जर मतांच्या गठ्ठ्यावरच न्याय देण्याच्या भूमिकेत असेल तर एकेक पत्रकार हा मतांचा गठ्ठा आहे.

# भारत बंद निमित्त पुण्यात पदयात्रेतून आक्रोश व्यक्त

**पुणे :** अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती च्या उपवर्गीकरण आणि आर्थिक निकषासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात आंबेडकरी चळवळीतील संघटनांनी २१ ऑगस्ट रोजी भारत बंद पुकारलेल्या भारत बंद निमित्त पदयात्रा काढून आक्रोश व्यक्त करण्यात आला. पुण्यातील बुद्धविहार तसेच आंबेडकर जयंती साजरी करणारी मंडळे या बंदमध्ये सहभागी झाली. सकाळी ११ वाजता लुम्बिनी बुद्धविहार (मंगळवार पेठ ) ते जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर पदयात्रा काढण्यात आली . त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांना निवेदन देण्यात आले.

सचिन गजरमल (अध्यक्ष,संविधान ग्रुपसतीश गायकवाड(अध्यक्ष,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आय ) ,दलित पँथर अध्यक्ष यशवंत नडगम ,वंचित बहुजन आघाडीचे अजय बालशंकर,राकेश सोनवणे, प्रवीण सोनावणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा प्रशिक्षण संस्था अध्यक्ष विजय कांबळे, विजय जगताप (जनहित जागृती मंच), आझाद समाज पार्टीचे स्वाती गायकवाड अर्चना केदारे,सुदीप गायकवाड (बहुजन समाज पार्टी), अनिल सरोदे हे आंबेडकर चळवळीचे प्रमुख नेते उपस्थित होते व त्यांच्याबरोबर इतर संघटनाही उपस्थित होत्या .पुण्यात अधिकारी,कर्मचारी,विद्यार्थ्यांनी बंद मध्ये सहभागी होऊन निर्णयाविरोधात आक्रोश व्यक्त केल्याची माहिती संविधान ग्रुपचे अध्यक्ष सचिन गजरमल यांनी दिली.

✻उपवर्गीकरण आणि आर्थिक निकषास विरोध✻

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या मुध्यावर एस.सी., एस.टी च्या उपवर्गीकरण व आर्थिक निकष लावणेबाबत निर्णय दिला आहे. हा निर्णय भारतीय एस.सी., एस.टी च्या हक्क अधिकार व विषमता व दुफळी निर्माण करणारा असल्यामुळे देशभरातील एस.सी., एस.टी च्या विविध संघटनांनी या निर्णयाच्या विरोधात शनिवार दि. २१ रोजी देशव्यापी भारत बंद ची घोषणा केली होती. आरक्षणासाठी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्यास मान्यता देतानाच तो अधिकार राज्य सरकारांना देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने गेल्या गुरुवारी दिला आहे. त्यासाठी उपवर्गीकरणास यापूर्वी अनुमती नाकारणारा आपलाच १९ वर्षांपूर्वीचा निकाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अधिपत्याखालील खंडपीठाने फिरवला आहे. या नव्या निर्णयाने याच सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी म्हणजेच २००४ साली ई. व्ही. चिन्नय्या वि आंध्रप्रदेश राज्य हा स्वतःच दिलेला पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरविला आहे.आता यावेळी सर्वोच्च न्यायालयात एससी, एसटीच्या आरक्षणाच्या वर्गिकरणाचा मुद्दा होता. तरीही त्यापुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व जमातींना क्रिमीलेअर लावण्याचा निर्णय देऊन टाकला. आरक्षण हे फक्त एका पिढीपर्यंतच ठेवावे, ही मर्यादा कुठलाही संविधानिक आधार नसताना एका न्यायमूर्तींच्या निर्णयात बेमालूमपणे टाकण्यात आली. या सर्व निर्णयाला चळवळीने विरोध केला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या नव्या निकालामागे आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या अत्यल्प लोकसंख्या असलेल्या अनेक उपेक्षित अनुसूचित जातींबद्दलचा कळवळा असल्याचे भासू शकते. पण प्रत्यक्षात मात्र, त्यातून अनुसूचित जातींमध्ये आपसात हेवा, आकसाला खतपाणी मिळून त्यांच्यात दुही- - कलह माजण्याचा धोका निर्माण झाला आहे.आरक्षणाचा लाभ प्रबळ अनुसूचित जातीच उपटत असून त्या लाभापासून इतर मायक्रो अनुसूचित जाती वंचित राहिल्या आहेत, अशा तक्रारींचा सूर निघताना दिसत आहे.


यासंदर्भात काही जातींनी न्यायसंस्थेकडे दादही मागितली होती हे खरेच. पण त्यांच्या तक्रारीत तथ्य असले तरी आरक्षणाच्या मिळालेल्या लाभाचा समग्र आढावा घेऊन त्याचा लेखाजोखा अधिकृतपणे कुणी कधी मांडला आहे काय ? असा प्रश्न आंदोलकांनी विचारला .

# ‘अमूल’चा जगभरात डंका

## बनली जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड कंपनी

**मुंबई :** अमूल या देशातील प्रमुख दूध उत्पादक सहकारी संस्थेचा जगभरात डंका पाहायला मिळत आहे. ब्रँड फायनान्स अहवालानुसार अमूल हा जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनला असून, या अहवालात अमुलला ---+ रेटिंग देण्यात आले आहे. अमुलने हर्शीज या कंपनीला मागे टाकत, प्रथम स्थान पटकावले आहे.

अमूल या देशातील प्रमुख दूध उत्पादक सहकारी संस्थेचा भारतभर दबदबा आहे. अशातच आता जगानेही अमूलचा जागतिक दबदबा मान्य केला आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका अहवालानुसार, अमूल हा जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनला असून, या अहवालात अमुलला ---+ रेटिंग देण्यात आले आहे. कंपनीची ब्रँड व्हॅल्यू देखील ३.३ बिलियन डॉलर इतकी झाली आहे. कंपनीने मागील वर्षी या यादीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या हर्शीज या




कंपनीला मागे टाकले आहे.

१९४६ साली गुजरातच्या आणंद शहरामध्ये स्थापन करण्यात आलेली अमूल कंपनी भारतामध्ये दूध क्रांती घडवून आणण्यासाठी ओळखली जाते. अर्थात ७० वर्षांपुर्वी सुरु झालेली ही कंपनी आता ब्रँड फायनान्सच्या ग्लोबल फूड अँन्ड ड्रिंक्स रिपोर्ट २०२४ नुसार, जगातील सर्वात मजबूत फूड ब्रँड बनली आहे. ब्रँड स्ट्रेंथ इंडेक्सवर अमुलचा स्कोअर हा १०० पैकी ९१ इतका नमुद करण्यात आला आहे. याशिवाय, कंपनीला ---+ रेटिंग देखील मिळाले आहे.

अमूलचे ब्रँड मूल्य ११ टक्क्यांनी वाढले

२०२३ च्या तुलनेत यावर्षी अमूलचे ब्रँड मूल्य ११ टक्क्यांनी वाढून ३.३ अब्ज डॉलर झाले आहे. तर २०२२-२३ या आर्थिक वर्षात अमूलची विक्री ही १८.५ टक्क्यांनी वाढून, ७२,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तर आता ब्रँड फायनान्स अहवालात, अमुलला हर्शीज कंपनीसोबतच ---+ रेटिंग देण्यात आले आहे. दोन्ही कंपन्यांचे रेटिंग सेम असले तरी हर्शीजची ब्रँड व्हॅल्यू ०.५ टक्क्यांनी घसरून ३.९ अब्ज डॉलरपर्यंत खाली आली आहे. त्यामुळे यावर्षी ब्रँड फायनान्स अहवालाच्या यादीत हर्शीज दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे.

# शेखर कपूर ठरले राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वाधिक मागणी असलेले दिग्दर्शक

**मुंबई :** ऑस्कर-नामांकित आणि बाफ्टा-विजेता चित्रपट निर्माता शेखर कपूर 'एबोनी मॅक्वीन' या संगीतमय वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटाचे दिग्दर्शन करणार असून ज्यात शेरॉन डी क्लार्क, अवंतिका आणि थॉमस स्मिथ मुख्य भूमिकेत आहेत. या अर्ध-आत्मचरित्रात्मक चित्रपटाचे संगीत ऑस्कर विजेते संगीतकार ए.आर. रहमान यांनी दिले आहे तर या चित्रपटाचे सह-लेखक तसेच सह-निर्माते डेव्ह स्टीवर्ट हे गाणी तयार करत आहेत.

२०२५ मध्ये याला सुरुवात होणार आहे. स्टीवर्टच्या सुरुवातीच्या जीवनापासून प्रेरणा घेऊन शेखर कपूर दिग्दर्शित मुख्य पात्र चार्ली मॅकगार्वे यांच्याभोवती फिरते जो प्रो फुटबॉलर बनण्याचे स्वप्न पाहतो परंतु विनाशकारी दुखापतीमुळे त्याच्या आशा भंग पावल्या आहेत. त्याच्या आजूबाजूचे जग विस्कटले असूनही, त्याला संगीत तयार करण्याची जादू



कशी कळते या कथेतून त्याचा प्रवास उलगडणार आहे.

शेखर कपूर सध्या भारतात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करत असून ते जगभरातील सर्वाधिक मागणी असलेले चित्रपट निर्माता म्हणून स्थापित झाले आहेत. त्याच्या 'बँडिट क्वीन', 'एलिझाबेथ' किंवा २०२२ मधील 'व्हॉट्स लव्ह गॉट टू डू विथ इट?' आणि इतर अनेक चित्रपटांनी त्याला बाफ्टा पुरस्कार आणि राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार यांसारखे अनेक प्रमुख पुरस्कार मिळवून दिले आहेत.

एबोनी मॅक्वीन' व्यतिरिक्त शेखर कपूर त्याच्या आगामी रिलीज 'मासूम...द नेक्स्ट जनरेशन' साठी तयारी करत आहे, ज्यामध्ये त्यांची मुलगी कावेरी कपूरचे पदार्पण होईल. त्यांची अलीकडेच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, गोवा च्या ५५ व्या आणि ५६ व्या आवृत्तीचे महोत्सव संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

# भगव्या सप्ताहाच्या निमित्ताने ठाकरे गटाच्या वतीने आरोग्य तपासणी

**सातारा :** शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून भगवा सप्ताह संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे .त्या अनुषंगाने शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रणव सावंत यांच्या पुढाकाराने शाहू बोर्डिंग येथील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली यासाठी जिल्हा परिषद नागरी आरोग्यवर्धिनी केंद्राच्या मंगळवार पेठेतील वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांना मदत केली

पद्मविभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे पहिले वस्तीगृह म्हणून या ठिकाणाचा नावलौकिक आहे. ज्या ठिकाणी एकलपालक, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले राहून रयतच्या शाळेत शिक्षण घेत आहेत या मुलांचे आरोग्य तसेच रक्त हिमोग्लोबिन सीबीसी व इतर



घटकांची तपासणी या शिबिरात करण्यात आली याचवेळी येथील विद्यार्थ्यांना फळांचे वाटपही करण्यात आले यासाठी वसतिगृह अधीक्षक प्रशांत गुजरे डॉक्टर सुष्मिता सोनटक्के रमेश देशमुख संध्या किरडे भूषण गायकवाड मीना गुजर उमेश साळुंखे अमोल गोसावी सुनील पवार सागर धोत्रे आधी शिवसैनिक तसेच इतर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉक्टर सुष्मिता सोनटक्के यांनी दर दोन ते तीन महिन्यातून एकदा शिबीर या ठिकाणी घेण्याच्या आश्वासन दिले प्रशांत गुजरे व प्रणव सावंत यांनी संबंधितांचे आभार मानले.

# डॉ. दाभोलकर स्मृती दिनानिमित्त खासदार उदयनराजे यांना निवेदन

**सातारा :** डॉ .नरेंद्र दाभोलकर स्मृति दिनाचे औचित्य साधून आज महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, सातारा यांनी खासदार उदयनराजे भोसले यांच्या जलमंदिर निवासस्थानी येथे भेट घेऊन जादूटोणा विरोधी कायदा संपूर्ण देशात लागू व्हावा यासाठी केंद्र शासनाने पावले उचलावी या मागणीचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद आहे की समाजात मोठ्या संख्येने सुरू असलेल्या बुवाबाजी,शोषण यामुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होऊन जात आहेत ,त्यातच हातरस सारख्या घटनेतून शेकडो गरीब,लोकांचे प्राण जात आहेत म्हणून महाराष्ट्र राज्याचे प्रमाणे संपूर्ण देशभर जादूटोणा विरोधी कायदा लागू व्हावा यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावी यासाठीचे निवेदन देण्यात आले .

त्यावेळी तत्काळ निवेदन पत्रावर कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना खासदार उदयनराजे भोसले महाराज यांनी दिल्या .

# राज ठाकरेंनी सरकारला धारेवर धरलं

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांना दीड हजार रुपये दिले जात असतानाच, दुसरीकडे महिलांवरील अत्याचाराच्या घटनांवरुन विरोधक आक्रमक बनले आहेत. आता बदलापूर घटनेवरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे संतापले आहेत. बहिणींना पैसे देऊन स्वतःचं ब्रॅण्डिंग करण्यापेक्षा ती सुरक्षित आहे, ही भावना निर्माण करा असे खडे बोल सुनावणीत राज ठाकरे यांनी सरकारला धारेवर धरलंय.

राज ठाकरे यांनी एक्स वरील पोस्ट वरून सरकारवर हल्लाबोल केला आहे. जनतेच्या पैशातून, बहिणींना पैसे देऊन, स्वतःचं ब्रॅण्डिंग करण्यापेक्षा ती सुरक्षित आहे, ही भावना जरी निर्माण केलीत तरी खूप आहे. माझ्या पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांमुळे हा विषय आज समोर आलाय, याचा मला अभिमान आहे. पण, मुळात असे प्रकार घडू नयेत यासाठी कडक कायदे आणि त्याची अंमलबजावणी होणं गरजेचं आहे, असेही राज यांनी ट्विटरवरुन लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

मुखमंत्र्यांना लक्ष्य

मुळात हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा जिल्हा. या जिल्ह्यातच जर कायदा धाब्यावर बसवला जात असेल तर बाकी ठिकाणची परिस्थिती काय असेल याची कल्पना पण करवत नाही. आज सरकार 'लाडकी बहीण' योजनेच्याद्वारे स्वतःच कौतुक करून घेण्यात मग्न आहे, पण जर तुमची बहीण खरंच लाडकी असेल तर तिच्यावर अशी वेळ येऊ नये आणि दुर्दैवाने आलीच तर तिला न्याय मिळेल हे पाहणं, हे पहिलं कर्तव्य नाही का ?, असा सवाल राज ठाकरेंनी विचारला आहे. दरम्यान, मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या विदर्भ दौऱ्याला आजपासून सुरुवात झाली असून आज ते गोंदिया जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक घेत आहेत.

# भूखंड खरेदीची चौकशी करण्याची सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरेंची मागणी

**सातारा :** जिल्ह्यातील जावळी, महाबळेश्वर, पाटण व सातारा या तालुक्यातील पुणे, मुंबईच्या धनदांडग्यांनी खरेदी केलेल्या शेकडो एकर भूखंड खरेदीची चौकशी पूर्ण होईपर्यंत सर्व पर्यटन प्रकल्पांना जिल्हाधिकाऱ्यांनी स्थगिती देण्याची मागणी सामाजिक, माहिती अधिकार, पर्यावरणवादी कार्यकर्ते सुशांत मोरे यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

निवेदनात, सह्याद्री पश्चिम घाट हा आंतरराष्ट्रीय जैविक संपत्तीचा वारसा आहे. परिणामी प्रस्तावित आगामी पर्यटन प्रकल्पांमुळे पर्यावरण, वन्यजीव व जैवविविधतेची मोठ्या प्रमाणावर हानी होणार आहे. या परिसरातील कोयना अभयारण्य व कास पुष्पपठार या स्थळांना २०१२ मध्ये जागतिक वारसास्थळाचा दर्जा मिळाला झाला आहे. या परिसरातील प्रस्तावित नियोजित प्रकल्प सह्याद्री डोंगररांगांच्या उत्तर-दक्षिणेला समुद्रसपाटीपासून सुमारे १२०० मीटर उंचीवर आहेत. या नियोजित प्रकल्पांच्या परिसरातून सोळशी, उरमोडी व कांदाटी या उपनद्या वाहतात. तसेच कोयना धरणाचा शिवसागर जलाशय ही आहे. प्रकल्प परिसरात घनदाट वनक्षेत्र असून तेथे समृद्ध जैवविविधता आणि विविध प्रकारचे दुर्मिळ वन्यप्राणी आहेत. कोयना अभयारण्य, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कास पुष्पपठार या जागतिक वारसास्थळांचा तसेच राखीव व संरक्षित संवेदनशील वनक्षेत्रे, वन्य प्राण्यांचे भ्रमण मार्ग, मोठ्या प्रमाणात जैवविविधता या घटकांचा समावेश प्रस्तावित अनेक प्रकल्प आराखड्यातील परिसरात आहे.

२००२ मध्ये केंद्रीय वन पर्यावरण मंत्रालयाने मा. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे महाबळेश्वर, पाचगणी ही ठिकाणे पर्यावरण व जैवविविधतेच्या संरक्षणासाठी इकॉलॉजिकली सेंन्सिटिव्ह झोन म्हणून जाहीर केली आहेत.

# जेएसपीएम विद्यापीठात उगम २०२४ चे उद्घाटन

## नव्या शैक्षणिक वर्षाची आशादायक सुरुवात

**पुणे :** जेएसपीएम विद्यापीठात उगम २०२४ - या दुसऱ्या इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचा उद्देश शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे असा आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माननीय प्रा. डॉ. तानाजी सावंत, कॅबिनेट मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, महाराष्ट्र सरकार आणि संस्थापक सचिव, जेएसपीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जेएसपीएम विद्यापीठाचे अध्यक्ष, डॉ. रवी जोशी, प्रो. बी.बी. आहुजा, कुलगुरू, डॉ. अजित थेटे प्रख्यात शिक्षणतज्ञ आणि नियामक मंडळ सदस्य जेएसपीएम विद्यापीठ,



विद्यापीठाचे कुलसचिव श्री. विशाल चौधरी, डॉ. महेश बुरांडे, संचालक आरोग्य विज्ञान विद्याशाखा, डॉ. अनुराधा देशपांडे, सहयोगी डीन (शैक्षणिक), डॉ. आर.एस. देशपांडे, डीन, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. प्रभासिंग शर्मा, डीन फॅकल्टी ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड कॉमर्स, डॉ. सागर वानखेडे, डीन फॅकल्टी ऑफ हेल्थ सायन्स, श्रीमती अर्पिता कासवा, डीन, फॅकल्टी ऑफ एज्युकेशन अँड ह्युमॅनिटीज, डॉ. दत्तात्रय भिसे, असोसिएट डीन (प्रशासन) यांच्यासह विद्यार्थी आणि प्राध्यापक सदस्य या मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवासाची सुरुवात झाल्याचे प्रतीक म्हणून या सोहळ्याची सुरुवात पारंपारिक दीपप्रज्वलनाने झाली.

याप्रसंगी बोलताना प्रा. (डॉ.) तानाजी सावंत यांनी मुख्य भाषण केले. जे एस पी एम चे प्रमुख उद्दीष्ट हे व्यावसायिक प्रोत्साहन व रोजगार निर्मिती हे असून, सामान्य चौकट मोडून स्वतःचा विकास, स्वअध्ययन, स्वनिर्मिती आहे असे त्यांनी वेळी नमूद केले. स्वतःचे गुरु स्वतःच बना असा गुरुमंत्रच त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. निर्णयक्षमता वाढवा, प्रामाणिक हेतू व कठोर परिश्रमाची तयारी असेल तर तुम्ही यशाला गवसणी घालाल. याशिवाय सेल्फ लर्निंग लॅब हि संकल्पना खखढ च्या धर्तीवर अमलात आणणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. जास्तीत जास्त उद्योजक घडविणे हा या संस्थेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या दोन पैलूंवर त्यांनी लक्ष वेधून घेतले,

एक शैक्षणिक दर्जा वाढविणे व दुसरा सुसंस्कृत युवा पिढी तयार करून देशाच्या सामाजिक प्रगतीत योगदान देणे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक पदवी अभ्यासक्रम हा तीन ऐवजी चार वर्षांचा असून अंतिम वर्षात विद्यार्थ्यांना इंटर्नशिप हा प्रात्याक्षीक विषय असणार आहे.

# स्वप्निल कुसाळेचे कोल्हापुरात भव्य मिरवणुकीने जल्लोषी स्वागत

**कोल्हापूर :** ढोल-ताशांचा गजर.. हलगीचा निनाद.. हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी.. मिरवणुक मार्गावरील रांगोळ्या, सजवलेल्या घोड्यावरुन पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या महिला.. अशा प्रचंड उत्साहात आणि जल्लोषात ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक विजेता कोल्हापूरचा सुपुत्र नेमबाज स्वप्निल कुसाळे याचे कोल्हापुरात भव्य मिरवणुकीने स्वागत करण्यात आले. यावेळी पालकमंत्री हसन मुश्रीफ, लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्याचे स्वागत केले. ताराराणी चौकात आल्यावर सर्वप्रथम स्वप्निलने महाराणी ताराराणी यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली.

यावेळी खासदार शाहू महाराज छत्रपती, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार सतेज पाटील, जयंत आसगावकर, आमदार ऋतुराज पाटील, आमदार राजेश पाटील, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर,जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. के. मंजूलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व क्रीडाप्रेमी तसेच कोल्हापूरकर मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले.

ताराराणी चौकातून सुरु झालेली मिरवणुक मध्यवर्ती बसस्थानक - व्हीनस कॉर्नर मार्गे -दसरा चौकात मार्गक्रमणा झाली. ढोल -ताशांचा गजर व हलगीच्या निनादाने वातावरण यांना दुमदुमुन गेले.

सजवलेल्या घोड्यावरुन पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या महिला, हातात फुलांच्या पाकळ्या घेऊन उभे राहिलेले विद्यार्थी, हेलिकॉप्टर मधून होणाऱ्या पुष्पवृष्टीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रचंड उत्साहाने केलेल्या स्वागताने स्वप्निल कुसाळे भारावून गेला.. आपल्या मातीत झालेल्या सन्मानाचा आनंद त्याच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत होता.

व्हीनस कॉर्नर येथे मिरवणुक आल्यानंतर स्वप्नीलने छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यानंतर मिरवणुक दसरा चौकात आल्यावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्याला स्वप्निलने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.. तसेच राष्ट्रध्वज लपेटून उपस्थितांना वंदन केले, यावेळी उपस्थितांनी प्रचंड जल्लोष



करत टाळ्या, शिट्ट्या व घोषणांनी त्याला दाद दिली.

झेंडूच्या फुलांच्या माळांनी अत्यंत आकर्षक पद्धतीने सजवलेल्या वन विभागाच्या वाहनातून स्वप्निलची मिरवणुक काढण्यात आली. या वाहनात स्वप्निलची आई अनिता, वडील सुरेश कुसाळे यांच्यासह कुटुंबिय व कोच.. त्याच्यासोबत होत्या. मिरवणुक मार्गावर ठिकठिकाणी स्वागत कमानी व स्वप्निलचे कटआऊटस् लावण्यात आले होते. शहरातील मुख्य मार्गावर स्वप्निलची मिरवणुक असल्यामुळे शहरातील प्रमुख मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. विद्यार्थी, युवा, अबालवृद्धांसह कोल्हापुरकरांच्या अलोट गर्दीत स्वप्निल कुसाळे याची भव्य आणि जंगी मिरवणुक पार पडली.

## शिरोळ विधानसभा निवडणूक महाविकास आघाडी कडून लढविण्यास इच्छुक : गणपतराव पाटील

**शिरोळ :** येथील दत्त उद्योग समूहाचे चेअरमन माजी आमदार आप्पासाहेब उर्फ सारे पाटील यांचे चिरंजीव यांनी काँग्रेस पक्षाकडे शिरोळ विधानसभे करिता उमेदवारी मागितले आहे काँग्रेस पक्षाने मला उमेदवारी दिल्यास महाविकास आघाडीकडून शिरोळ विधानसभा निवडणूक लढविणार असल्याची माहिती दस्तूर खुद्द दत्तचे चेअरमन गणपतराव पाटील दादा यांनी कारखाना स्थळावर बोलवलेल्या भरगच पत्रकार परिषदेत माहिती दिली

व्हिएतनाम येथे १६ सप्टेंबर रोजी होत असलेल्या जागतिक ऊस परिषदेमध्ये दत्तच्या सछिद्र जमीन सुधारणा या पेटंटला सादर करण्यास जागतिक ऊस परिषदेने मान्यता दिली आहे त्या संदर्भात पत्रकार परिषद बोलावली होती गेल्या अनेक दिवसापासून दत्तचे चेअरमन गणपतराव पाटील हे विधानसभा निवडणुकीबाबत कोणती भूमिका घेतात याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते त्यांच्या या भूमिकेमुळे गणपतराव पाटील निवडणूक लढविणार हे स्पष्ट झाल्याने त्यांचे कार्यकर्ते मध्ये आनंदी वातावरण तयार झाले आहे

या अगोदर त्यांना अनेक वेळा त्यांच्या त्यांचे उमेदवारी बाबत विचारले असता त्यांनी थांबा आणि पहा भूमिका घेतली होती या परिषदेत पत्रकारांनी त्यांना या प्रश्नावर छेडले असता दिलखुलासपणे उत्तर देत मी काँग्रेस पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता आहे मी काँग्रेसकडे शिरोळ विधानसभेची उमेदवारी मागितली आहे मला उमेदवारी मिळाली तर महाविकास आघाडीतील घटक पक्षांना बरोबर घेऊन निवडणूक लढवली जाईल असे शेवटी त्यांनी स्पष्ट केले.

## सांगलीत लोकसभेची पुनरावृत्ती विधानसभेतही होणार? तिकीट न दिल्यास काँग्रेसच्या जयश्री पाटील अपक्ष लढणार



**सांगली :** २०२४ च्या लोकसभा निवडणुका पार पडल्या आहेत. यामध्ये राज्यातील अनेक मतदारसंघ चर्चेत होते त्यात सांगली लोकसभा मतदारसंघाचा समावेश होता. काँग्रेसचे नेते विशाल पाटील यांनी बंडखोरी करून निवडणूक लढवली आणि खासदार झाले. अशातच आता आगामी विधानसभा निवडणुकीत देखील काँग्रेसमध्ये बंडखोरी होण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या जयश्री पाटील या सांगली विधानसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत. काँग्रेसचे पृथ्वीराज पाटील आणि जयश्री पाटील यांच्यामध्ये सध्या उमेदवारी बाबत चढाओढ सुरू असल्याचं पहावयास मिळतं. जयश्री पाटील यांनी काँग्रेसकडे विधानसभेचं तिकीट मागितल आहे. परंतु काँग्रेसने उमेदवारी न दिल्यास जयश्री पाटील या बंडखोरी करीत अपक्ष निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे.

काँग्रेसने जयश्री पाटील यांना तिकीट न दिल्यास विधानसभेमध्ये देखील बंडखोरी अटळ आहे. तसेच आमच्यासोबत काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम आणि काँग्रेसचे २० नगरसेवक असल्याचा दावा देखील जयश्री पाटील यांनी केला आहे. त्यामुळे सांगली विधानसभेसाठी काँग्रेसची माळ जयश्री पाटील यांच्या गळ्यात पडली नाही तर मात्र जयश्री पाटील या अपक्ष लढण्यावर ठाम असल्याने महाविकासआघाडी मधील बंडखोरी अटळ असल्याचं पहावयास मिळतं. तसेच गेल्या अनेक दिवसापासून विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी करीत असून विधानसभा निवडणूक लढवण्यावर जयश्री पाटील ठाम असल्याचे त्यांनी पत्रकार परिषद घेत घोषित केले आहे.

जयश्री पाटील म्हणाल्या की, ''मागच्या वेळेस काही कारणास्तव आम्ही पृथ्वीराज पाटील यांना पाठिंबा दिला होता. त्यावेळेस पृथ्वीराज पाटील यांनी आम्हाला शब्द दिला होता की पुढच्या वेळेस तुम्ही निवडणूक लढा मी तुम्हाला पाठिंबा देतो त्यांनी त्यांच्या शब्दाला जागून मला पाठिंबा द्यावा''. अशी मागणी यावेळेस जयश्री पाटील यांनी केली आहे.

## सातारा जिल्हयाला मिळणार आणखी एक खासदार

### नितिन पाटील आज मान्यवरांच्या उपस्थितीत भरणार अर्ज, अजितदादांनी दिलेला शब्द पाळला

**सातारा :** सातारा जिल्ह्याला खासदार उदयनराजे यांच्यानंतर सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन नितीन काका पाटील यांच्या रूपाने आणखी एक खासदार मिळणार आहे. महाराष्ट्रात राज्यसभेच्या दोन पैकी एका जागेवर उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी कोट्यातून नितीन पाटील बुधवारी दुपारी राज्यसभेसाठी अर्ज भरणार आहेत. या वृत्तामुळे वाई तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात विशेषतः नितीन काका समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान नितीन काकांना मी खासदार करतो असा शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वाई येथील सभेत दिला होता तो त्यांनी पाळल्याने शब्दाचा पक्का वादा अजितदादांचा शब्द ग्हणजे काळ्या दगडावरची रेघ हे पुन्हा एकदा महाराष्ट्राने पाहिले आहे .लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान सातारा लोकसभा मतदारसंघातून



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा उमेदवार उभा राहील असे भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने घेतली होती महायुतीत सातार लोकसभा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीच्या वाट्याला आल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या बदल्यात राज्यसभेची जागा भारतीय जनता पार्टीकडे मागितली होती हि जागा आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाला मिळाली असून या जागेवर आता नितीन काका पाटील यांची वर्णी लागली आहे त्यामुळे वाईसह राष्ट्रवादीच्या गोटात आनंद द्विगणित झाला आहे.

खासदार उदयनराजे भोसले यांच्या वाई येथील सभेमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर वक्तव्य केले होते की माहितीच्या उमेदवारांना तुम्ही प्रचंड मताने विजयी करा मी नितीन काकाला खासदार करतो नाहीतर पवारांच्या अवलाद सांगणार नाही अशा प्रकारचे वक्तव्य केले होते .शब्दाचा पक्का वादा अजितदादा याची प्रचिती पुन्हा सातारा जिल्ह्याने अनुभवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या सोमवारी झालेल्या बैठकीत नितीन पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. बुधवारी दुपारी १२ वाजता नितीन पाटील राज्यसभेचा उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. राज्यसभेच्या निमित्ताने नितीन काका यांची नवी राजकीय इनिंग सुरू होत असून सातारा जिल्ह्याला पाटील यांच्या रूपाने दुसरा खासदार मिळाला आहे.

## कोरेगावात अल्पवयीन मुलीच्या विनय भंग प्रकरणी पोक्सो अंतर्गत दोघांवर गुन्हा दाखल

**कोरेगाव :** कोरेगाव येथील एका अल्पवयीन मुलीचा विनय भंग केल्याप्रकरणी कोरेगाव पोलिसांनी पोक्सो अंतर्गत दोघांना चौकशी कामे ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. संशयित आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले असता दिनांक २१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

याबाबत कोरेगाव पोलिसांनी सांगितले की, दिनांक १९ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास कोरेगाव येथील वीरकरांच्या गोडाऊन जवळ झाडीत संबंधित संशयित आरोपी समाधान नथू कांबळे, सध्या राहणार वर्धनगड तालुका खटाव मूळ राहणार नागठाणे ता. जि. सातारा याने एका अल्पवयीन मुलीला शंभर रुपये देतो असे सांगून तिचा विनयभंग केला. यावेळी त्याला सचिन लक्ष्मण देढे. राहणार लक्ष्मी नगर कोरेगाव यांनी मदत केली.

संबंधित अल्पवयीन युतीच्या नातेवाईकांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून कोरेगाव पोलिसांनी संशयीत आरोपी समाधान नथू कांबळे व सचिन लक्ष्मण देढे यांना चौकशीकामी ताब्यात घेऊन त्यांच्यावर बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८,१२ अन्वये गुन्हा दाखल केला.

संशयित आरोपींना कोरेगाव पोलिसांनी अटक करून न्यायालयात हजर केले असता त्यांना दि. २१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश माने करीत आहेत.

## वर्धनगड येथील मानाई माता व महादेव मंदिराचा कलशारोहण सोहळा २३ ऑगस्ट रोजी

**वर्धनगड :** वर्धनगड येथील मानाई माता व महादेव मंदिराचा कलशारोहण सोहळा तसेच महादेव मंदिरसमोर गडावरती नंदीची प्राणप्रतिष्ठापना शुक्रवार २३ ऑगस्ट रोजी श्री सेवागिरी देवस्थानचे मठाधिपती १०८ परमपूज्य श्री महंत सुंदरगिरीजी महाराज यांचे शुभहस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री वर्धनीमाता भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

गुरुवार २२ ऑगस्ट रोजी



सायंकाळी ४ ते ६ गावातून भव्य मिरवणूक शुक्रवार २३ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता होम हवन सकाळी १० ते १२ किर्तन ह भ प बाजीराव महाराज रणसिंग (रणसिंग वाडी) यांचे सृश्राव्य कीर्तन दुपारी १२ नंतर कलशारोहण समारंभ व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री वर्धनी माता भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## अपघातामध्ये दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**खंडाळा :** पुणे-बेंगलोर महामार्गावर खंडाळा येथील खांबाटकी घाटामध्ये रक्षाबंधनादिवशी दि.१९ रोजी ट्रक व दुचाकीच्या झालेल्या अपघातामध्ये दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला.

याबाबत खंडाळा पोलिस व घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, ओमकार संतोष मराठे (वय-२२ वर्षे, रा. बालघेर ता. वाई जि. सातारा) हा युवक पुणे येथे कामानिमित्त कार्यरत होता. सोमवार दि.१९ रोजी रक्षाबंधन असल्याने आपल्या मूळगावी बालघेर येथे जाण्यासाठी दुचाकीवरून (क्र.एम.एच.११ डी.के ८२७३) निघाला होता. दरम्यान, दुचाकी खंडाळ्यात खांबाटकी घाटातील दत्त मंदिराच्या वळणाजवळ आली असता मालवाहतुकीच्या ट्रकची (क्र. एम.एच ०९ इ.एम.८९५९) दुचाकीला धडक बसली. युवक गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

## पाणीपुरवठा होत नसल्याने नगरपंचायतीला नागरिकांचे निवेदन

**खंडाळा :** शहरातील प्रभाग क्रमांक सातमध्ये गेल्या चार दिवसांपासून ऐन सण- उत्सवाच्या काळात पाणीपुरवठा होत नसल्याने प्रभागातील संतप्त नागरिकांनी मुख्याधिकारी चेतन कोंडे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये दिलेली अधिक माहिती अशी की, खंडाळा शहरातील प्रभाग क्रमांक सातमध्ये गेल्या चार-पाच दिवसांपासून पाणी पुरवठा बंद आहे. सलगच्या सुट्ट्या, सण उत्सवाच्या कालावधीत पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. प्रभागात पाण्याची समस्या अतिशय गंभीर झाली असून नगरपंचायत प्रशासनाने यावर लक्ष दिले नाही तर नगरपंचायत कार्यालयासमोर उपोषण केले जाईल असा इशाराही या निवेदनामध्ये देण्यात आला आहे. दरम्यान, निवेदनाची दखल घेत पाणी पुरवठा सुरू केल्याचे सांगण्यात आले.

यावेळी ज्योतिबा जाधव,विजय जाधव, आकाश लिमण, अक्षय जाधव,सुमित जाधव आदी उपस्थित होते.

## देगाव येथे मेडिकल दुकानातील महिलेला बेदम मारहाण

**सातारा :** जुन्या प्रिस्क्रिप्शन नुसार गोळ्या देण्यास नकार दिल्याने चिडलेल्या युवतीने मेडिकल मधील महिला व्यावसायिकाला बेदम मारहाण केल्याची घटना दिनांक १९ रोजी दुपारी सव्वा एकच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी पल्लवी अजित माने, वय २९ भारत मेडिकल कारंडवाडी देगाव तालुका जिल्हा सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पूजा गायकवाड व सुरज गायकवाड दोघेही राहणार कोडोली यांच्या विरोधात तक्रार देण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी पूजा गायकवाड ही युवती युटीझोलाम गोळी घेण्यासाठी भारत मेडिकल या दुकानात आली होती मात्र त्याचे प्रेस्क्रीप्शन जुने असल्याने फिर्यादीने नवीन प्रिस्क्रीप्शन मागितले आणि गोळ्या देण्यास नकार दिला. त्यावेळी चिडलेल्या पूजा गायकवाडने काउंटर वरील फिर्यादीला अपशब्द वापरले आणि शिवीगाळ केली.

माझा भाऊ सुरज गायकवाड इथला भाई आहे असे सांगितले त्याला फोन करून बोलावून घेतले तसेच या युवतीने हाताने लाथा बुक्क्यांनी महिलेला मारहाण करून तिचा चष्मा फोडला व संगणकाचे नुकसान केले. सुरज गायकवाड यांने सुद्धा फॉर्च्युनर गाडीतून येऊन मेडिकल दुकानाच्या परिसरात दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. संबंधित महिलेला शिवीगाळ व दमदाटी केली.

## स्वराज चव्हाण यास राज्यस्तरीय थांगता स्पर्धेत सुवर्णपदक

**वर्धनगड :** नेर (पुसेगाव) येथील सामाजिक कार्यकर्ते श्री गजानन चव्हाण यांचा सुपुत्र कु. स्वराज चव्हाण याने वर्धा येथे १६ व १८ ऑगस्ट रोजी झालेल्या राज्यस्तरीय थांगता (तलवारबाजी) या स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून उत्तुंग अशी कामगिरी केली आहे.



१६ व १८ ऑगस्ट रोजी वर्धा येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये १४ वर्ष वयोगट थांगता या क्रीडा स्पर्धेमध्ये डॉक्टर राधाकृष्णन इंग्लिश मीडियम स्कूल पुसेगाव इयत्ता आठवीमध्ये शिकत असलेला विद्यार्थी कु स्वराज गजानन चव्हाण या विद्यार्थ्याने सुवर्णपदक पटकाविले व या कामगिरीसाठी त्याची मध्यप्रदेश ग्वाल्हेर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे यासाठी त्याचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

त्याच्या या यशामध्ये त्याचे प्रशिक्षक अजित पाटील, गोडसे सर व रोहन सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या त्याच्या यशाबद्दल सेवागिरी प्रसारक मंडळाचे तसेच राधाकृष्णन इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष डॉ. सुरेश जाधव उपसंस्थापक बाळासाहेब जाधव, संस्था सचिव मोहनराव जाधव, विश्वस्त विश्वनाथराव जाधव, योगेश देशमुख, एस आर पाटील संस्था सदस्य जयवंतराव जाधव प्रशासकीय अधिकारी डी पी शिंदे, मुख्याध्यापिका देशमुख मॅडम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पुसेगाव पंचक्रोशीतील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून ४०० विद्यार्थी व विद्यार्थिनी खेळण्यासाठी आले होते.

## तपोवनवरील महिला सन्मान सोहळ्याच्या तयारीची महायुतीच्या नेते मंडळींकडून पाहणी

**कोल्हापूर :** कोल्हापुरात गुरुवार दि. २२ महाराष्ट्र राज्य सरकारच्यावतीने महिला सन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे. मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत तपोवन मैदानावर सकाळी १० वाजता हा कार्यक्रम सुरू होणार आहे. या सोहळ्यानिमित्त राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व विविध मंत्री कोल्हापुरात येत आहेत. एक लाखावर अधिक



महिलांच्या उपस्थितीत हा महिला सन्मान सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीची पाहणी महायुतीच्या नेतेमंडळींनी केली. यामध्ये पालकमंत्री नामदार हसन मुश्रीफ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील आसुर्लेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सुजितभाऊ चव्हाण, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्यासाहेब माने, कोल्हापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आदिल फरास, भाजपचे महानगराध्यक्ष विजय जाधव, महेश जाधव, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त के. मंजूलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा देसाई यांचा समावेश होता.